# पुष्प चवथें

अध्यक्ष — द्. वा. पोतदार

वक्ते — श्री. शं. नवरे

११ मे १९४९

## दार कमिशन

गेलीं दोन तीन वर्षें या विषयावर एवढी चर्चा झाली आहे कीं, त्यासंबंधीं नवीन कांहीं सांगणें आतां मोठें कठीण होऊन बसलें आहे. दुसरा कटु अनुभव असा कीं, आपली न्याय्य बाजू आपण कितीही उत्कृष्ट रीतीनें मांडली तरी आज ती ऐकून घेण्यास कोणी तयार नाहीं. दार कमिशनपुढें महाराष्ट्रांतील सर्व पक्षांनीं आणि संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें आपली बाजू एकमुखानें मांडली. परंतु दार कमिशनचा रिपोर्ट पाहिला म्हणजे त्याच्यापुढें आलेल्या पुराव्याचा त्यानें विचार तरी केला असेल किंवा काय याचा संशय येतो. आलेला पुरावा न पहातां कमिशननें केवळ आपल्या पूर्व ग्रहावर सर्व रिपोर्टाची उभारणी केली आहे असा संशय घेण्याला जागा आहे. तुम्हांला जर हाच रिपोर्ट करावयाचा होता तर तुम्हीं चार पांच प्रांतांत फिरून साक्षीपुरावा गोळा करण्याचा तमाशा कां केलांत ? आणि स्वतःचा व दुसऱ्याचा वेळ व्यर्थ कां दवडलात ? असा दार कमिशनच्या एका सभासदालाच मी जयपूरला प्रश्न विचारला तेव्हां त्यानें ती गोष्ट हांसण्यावारी नेली.

## सरकारचा युक्तिवाद

दार कमिशननें मुळांतच घांव घातलेला भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न जयपूर समितीनें थोडासा सुकर केल्याचा भास होतो. कॉंग्रेसनें २८ वर्षें मान्य

केलेलें तत्व जयपूर समितीला एकदम डावलून देतां येईना. तेव्हां तिनें तत्व मान्य पण त्याची अम्मलबजावणी आजच नको असा निराळा मार्ग काढला. पण शेवटीं दार कमिशनचा जो परिणाम व्हावयाचा तोच जयपूर समितीचाही होत आहे. संयुक्त महाराष्ट्र आजच नको असें म्हणतांना, जयपूर समितीनें जीं कारणें दिलीं आहेत तीं पटण्यासारखीं नाहींत असा अभिप्राय महाराष्ट्र प्रांतिक कॉ. क. च्या आणि संयुक्त म. परिषदेच्या कार्यकारी मंडळांनीच एकमतानें व्यक्त केलेला असल्यामुळें त्यासंबंधीं आतां अधिक बोलण्याचें कारण नाहीं. तथापि समितीकडून ज्या अडचणी पुढें मांडण्यांत आल्या आहेत, त्या मनाला पटण्यासारख्या नसल्यामुळें वरकरणीं फक्त तत्वाला मान्यता देऊन तें कधींच आमलांत येऊं नये, अशी कॉंग्रेसच्या नेत्यांची इच्छा असल्याचें आज दिसतें. तुमची मागणी एकमतानें पुढें येऊं द्या म्हणजे आम्ही तिचा विचार करूं हें जयपूर समितीचें म्हणणें इंग्रजांच्या कुटील नीतीची आठवण करून देतें. स्वातंत्र्याची मागणी एकमुखानें येऊं द्या, असें इंग्रज देखील आपणाला वारंवार म्हणत नव्हते कां ? पण असें म्हणणें म्हणजेच फुटीर वृत्तीला उत्तेजन देणें होय. असा त्या वेळचा अनुभव आजही येत आहे. कारण निरनिराळ्या कारणासाठीं संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीला विरोध करणारे लोक पुढें ये त आहेत आणि त्यांचेकडे बोट दाखऊन पहा तुमच्यामध्यें एकी नाहीं असें निमित्त सांगण्यांस सरकारला अवसर मिळत आहे.

### वरील युक्तिवादांतील फोलपणा

यावेळीं सरकारला असें विचारतां येईल कीं, गेल्या दीड वर्षांमध्यें तुम्ही जे जे महान् प्रश्न सोडविलेत त्यांना कोणाचाच विरोध नव्हता काय ? संस्थानें प्रजेच्या आणि राजाच्या संमतीनें खालसा केलीं असें सांगत असतां राजे लोक अंतःकरणापासून राज्यत्याग करायला तयार झाले असतील यावर विश्वास बसणें कठीण आहे. दुसरें असें कीं एकाही संस्थानांत प्रजेचें सार्वमत घेण्यांत आलेलें नाहीं. आमचीं संस्थानें खालसा करू नका म्हणणारे

कांहीं लोक निघालेच कीं नाहीं? दारूबंदीलाही पुष्कळ लोकांनीं विरोध केला. जमिनदारी नष्ट करणें, श्रीमंतांवर कर वाढवणें, रेल्वेचे, पोस्टाचे, बोटींचे दर वाढविणें, नियंत्रणें उठविणें आणि बसविणें या सर्व बाबी काय एकूणएक लोकांच्या संमतीनें झाल्या? त्यांना विरोध करणारे कोणीच भेटले नाहीत? सुरक्षा कायद्याची जी कठोरपणें अंमलबजावणी चालली आहे ती काय सर्वांना मान्य आहे? असें असतां विरोधाची पर्वा न करतां अमूक गोष्ट देशाला हितकारक आहे असें म्हणून कॉंग्रेसच्या नेत्यांनीं तिचा पाठपुरावा केलाच कीं नाहीं? दारूबंदी संबंधीं किंवा संस्थानां संबंधीं वर जीं उदाहरणें दिलीं त्यांचा अर्थ या संबंधीं सरकारच्या धोरणाला माझा विरोध आहे असा नाहीं. एकूणएक लोकांच्या मान्यतेची वाट न पहातां अमूक गोष्ट चांगली आहे असें मनाला पटतांच सरकार त्याची अंमलबजावणी कशी करू शकते हेंच मला मुख्यतः येथें दाखवावयाचें आहे. ज्यांनीं फाळणीचें हलाहल वीष पचविलें त्यांना प्रांतांची पुनर्रचना करण्याची भिती वाटते यावर थोडयांचा विश्वास बसेल. येथें लोकसंख्येची अदलाबदल नाहीं, रक्तपात नाहीं, मारामारी नाहीं. भाषावार प्रांतीक घटक स्वतंत्र राष्ट्र म्हणून कारभार करणार नाहींत, त्यांना स्वतःचें सैन्य नसेल, आरमार नसेल, हवाईदल नसेल, परराष्ट्रीय राजकारण नसेल, व्यापक स्वरूपाचें आर्थिक धोरण नसेल, या गोष्टी मध्यवर्ती सरकारच्या अधिकारांतील आहेत. लोकशाहीच्या सोयीकरतां आणि नवीन मिळालेलें लोकराज्य अधिक दृढ करण्याकरतां आम्हाला भाषावार प्रांतरचना हवी आहे. जशी महाराष्ट्राला ती मिळावी तशी इतर प्रांतांनाही मिळावी असा आमचा आग्रह आहे. हा प्रश्न स्वार्थाचा नसून सोयीचा आहे. सर्व देशाच्या हिताचा आहे. संयुक्त महाराष्ट्राची मागणी करणारे लोक पुनः पेशवाई किंवा मराठी साम्राज्य निर्माण करूं इच्छितात असा आमच्या मागणीचा विपर्यास विशेषतः गुजराथी पत्रांतून चाललेला आहे. हैद्राबादप्रमाणें म्हैसूरवर देखील आमचा डोळा आहे असें 'मुंबई समाचार' या गुजराथी पत्रानें म्हटलें आहे. पण पत्र

त्यानें आधार दाखविलेला नाहीं. महाराष्ट्राला बदनाम करण्यासाठीं हा सर्व प्रचार बुद्धी पुरःस्सर चाललेला आहे याबद्दल गुजराथी पत्रांतील उतारे मी आपणांस देऊं शकेन.

## भाषावार प्रांतच कां ?

भाषावार प्रांत रचनेची मागणी केली ह्यांत संकुचित प्रांताभिमान किंवा भाषिकता ( Linguism ) आहे असें कन्हयालाल मुन्शी आम्हाला हिणवितात. पण त्यांना हा नवा साक्षात्कार झालेला दिसतो. कारण गेल्या वर्षी यांचं मुन्शींच्या अध्यक्षतेखालीं मुंबई गुजराथ महा संमेलन भरलें असतां, अहमदाबाद, खेडा, पंचमहाल, भडोच आणि सुरत हा, सध्याचा गुजराथ, बडोदें संस्थान, सौराष्ट्र आणि कच्छ अशा अनेक ठिकाणीं गुजराथी भाषा बोलणाऱ्यांची जी पांगापांग झालेली आहे, ती नाहीशी करण्यासाठीं सर्व गुजराथी भाषा-बोलणाऱ्यांचें एकीकरण व्हावें, एकाच कारभाराखालीं त्यांना आणावें, अशी मागणी एकमूखानें करण्यांत आली. आम्ही तरी याहून दुसरें काय मागतो आहोंत ? गुजराथ सारखी स्वतंत्र विद्यापिठाची मागणी करणें किंवा सर्व गुजराथी लोकांना एकत्र आणण्याचा हव्यास धरणें ही देखील भाषिकता नव्हे काय ? मग भाषेचा निराळा प्रांत मागितला तर तो अपराध कसा होतो ? आतां पर्यंत ज्या ज्या महान् राष्ट्रीय चळवळी झाल्या त्यांत सर्व लोकांनी भाषाभिमान व प्रांताभिमान सोडून भाग घेतलेला नाहीं काय ? महात्मा गांधींनी कॉंग्रेसच्या कारभारासाठीं म्हणजे कॉंग्रेसचा संदेश खेडोपाडीं पोचविण्याच्या उद्देशानें भाषावार प्रांत रचना केली. भाषावार राजकीय विभाग पाडावे असा गांधीजींचा हेतु नव्हता. असा मुन्शींनी आपल्या नवीन पुस्तकांत शोध लावला आहे कॉंग्रेस नामक एका राजकीय पक्षाचा संदेश खेडोपाडीं पोंचविण्यासाठीं जर भाषावार घटक पाहिजेत तर लोकशाहीचा संदेश खेडोपाडीं पोंचविण्यासाटीं तसे घटक असण्याची आवश्यकतेने जरूरी आहे, हें मुन्शींच्या लक्षांत येऊं नये याचें आश्चर्य वाटतें.

### हास्यास्पद ऐतिहासिक दाखले

आम्हाला पुन्हां मराठी साम्राज्य स्थापन करावयाचें नाही व याचा पुरावा हाच कीं बडोदें, इंदूर, ग्वाल्हेर, देवास, तंजावर या मराठी संस्थानावर आम्ही चुकून देखील हक्क सांगितलेला नाही. कारण त्या संस्थानांचे राजे मराठे असले तरी प्रजा अन्य भाषिय आहे हें आम्ही ओळखतों. याचें उलट विशिष्ट प्रदेशांत आज कोणती भाषा बोलणारे लोक आहेत याचा विचार न करत केवळ ऐतिहासीक आधार देऊन वसईच्या खाडीपर्यंत व खानदेशांत नंदूर्बार पर्यंत गुजराथची हद्द जाऊन भिडते असें मुन्शी बिनदिक्कत सांगतात. मुंबईत राहणारे कोळी देखील मूळ गुजराथचे. असा मुन्शींचा हास्यास्पद दावा आहे. पण हाच बुद्धिवाद चालविला तर ज्यावर महाराष्ट्राला हक्क सांगता येणार नाहीं अशी हिंदुस्थानांतील फारच थोडी भूमि शिल्लक उरेल.

### विधायक सूचना

सिमा ठरवितांना प्रांताप्रांतांत भांडणें उत्पन्न होतील आणि नवे वाद माजतील अशी काँग्रेसच्या नेत्याना भिती वाटते. आज अशी भांडणें बिलकूल नाहींत असें ते गृहीत धरून चालले आहेत. पण डांग, बेळगांव, कारवार, या सिमेवरील प्रांतांत महाराष्ट्र प्रा. काँ. क. चे अध्यक्ष नुकतेच फिरून आलेले आहेत त्यांची साक्ष काढा. प्रचलीत व्यवस्थेंत कोणताही बदल केला तरी असंतुष्ट झालेले कांहीं तरी लोक भेटणारच. पण त्यासाठीं सुधारणा अडून रहात नाहीत. भाषावार प्रांताच्या हद्दी ठरवितांना कोणत्या तत्वांचा अवलंब करावा हें सरकारनें एखादें कमिशन नेमून ठरवावें. आणि मग त्या तत्वांचा सर्वत्र सारखा उपयोग करावा. म्हणजे भांडणाला जागाच राहाणार नाही. सीमेवरील प्रदेशांची विभागणी करतांना जिल्हा किंवा तालूका हा घटक न धरतां गांव हा घटक धरावा आणि त्यांतही सलगता संभाळावी. हें तत्व संयुक्त महाराष्ट्र परीषदेनें वारंवार प्रतिपादलेलें आहे. त्यांत दोष कोठे आहे तें कोणीही दाखवून द्यावें.

### प्रश्न सोडविण्याचा मार्ग

एवढा विचार केल्यानंतर पुढें काय करावयाचें हा प्रश्न उभा रहातो. सर्व पक्षांची मिळून बनलेली संयुक्त महाराष्ट्र परिषद हिने ही चळवळ करावी. लोकांना निरानिराळे आदेश द्यावे. असें कांहीं लोकांनी सुचविलें आहे. पण संयुक्त महाराष्ट्र परिषद सर्व पक्षांची असली तरी त्या त्या पक्षांनी आपले अधिकृत प्रतीनीधी या संघटनेवर पाठविले नाहीत व म्हणून परिषदेचा आदेश त्या त्या पक्षांना बंधनकारक असूं शकत नाही ही व्यावहारीक मर्यादा लक्षांत ठेऊनच त्या परीषदेकडून आपण करावयाच्या अपेक्षा ठरविल्या पाहीजेत. सर्व लोक काँग्रेसमध्ये आल्यास काँग्रेसवर या बाबतींत दडपण आणतां येईल हा मार्ग कांहीं लोक सुचवितात. पण त्या बाबतींत आज पर्यंतचा अनुभव निराळा आहे. ऑल इं. कॉं. क. ची जयपूर समितीच्या रिपोर्टाला उद्या मान्यता मिळाल्यावर त्या विरुद्ध चळवळ करणे हा शिस्तभगांचा प्रश्न होणे अशक्य नाहीं. मग सर्वांचींच तोंडें बंद होतील. त्या ऐवजी प्रतिनीधीक संस्थानी संयुक्त महाराष्ट्राचे प्रश्नावर लोकमत आजमावण्याचा चंग बांधला तर काँग्रेसवर आणि सरकारवर त्याचा अधिक परिणाम होईल असें मला वाटतें. मालक मजूर आणि सरकार या तीन पक्षांनी गेल्या वर्षी आपसांत तहनामा करून तीन वर्षे पर्यंत एकमेकांशीं भांडायचें नाहीं असें ज्या प्रमाणें ठरविलें त्या प्रमाणें संयुक्त महाराष्ट्राविषयीं ज्यांना ज्यांना आस्था वाटते अशा सर्व पक्षांनी आपल्या पक्षांची इतर कामें तूर्त बाजूला ठेऊन एकजुटीनें या एकाच प्रश्नावर जोर दिला आणि प्रत्येक निवडणुकींमध्यें हा मुद्दा मतदारापुढें ठेऊन एकमेकाविरूद्ध आपसांत उमेदवार उभे करण्याचें टाळले तर लोकमताचा प्रभाव घसघशीत रीतीनें व्यक्त होईल आणि मग सरकारलाही आपल्या मागणीचा विचार करणे भाग पडेल. अत्याचार जाळपोळ करबंदी हे उपायही इतके प्रभावी होऊ शकणार नाहींत. लोकांना अशी संवय लावणे इष्ट नाहीं. मत (vote) हेंच लोकशाहींतील अत्यंत तीक्ष्ण आणि प्रभावी अस्त्र आहे. त्याचा एकजुटीनें जास्तींत जास्त उपयोग केला तर कदाने-

पेक्षां थोडया अवधींत आपण दशरवी होऊं. मला या संबंधीं मुळींच निराशा वाटत नाहीं. अखंड मागत राहीलें म्हणजे मिळतें.

## अध्यक्षीय समारोप

मी कोणत्याही राजकीय पक्षांत नाहीं. माझी संयुक्त महाराष्ट्रसंबंधींचीं मतें स्वतंत्र आहेत आणि तीं मी आज सांगणार आहे. संयुक्त महाराष्ट्र परीषदेचा अध्यक्ष या नात्यानें मी भाषणास उभा राहीलेलो नाहीं.

### भाषावार प्रांतरचनेशिवाय लोकशाही अशक्य

खऱ्या लोकशाहीच्या स्थापनेसाठीं व संगोपनासाठीं भाषावार राज्य-विभाग करणें अवश्यक आहे. या शिवाय दुसरा मार्गच नाहीं. लोकशाही राज्य लोकभाषेशिवाय होऊंच शकत नाहीं. पूर्वीच्या काळीं राज्यकारभाराशीं सामान्य जनतेचा संबंध नसे. आतां लोकशाहींत राज्यकारभाराची जबाबदारी जनतेवर पडते. म्हणून जनतेला राज्यकारभाराची माहिती कळणें आवश्यक होऊन बसलें आहे आणि ही गोष्ट लोकभाषेशिवाय अशक्य आहे.

### संयुक्त महाराष्ट्राची ऐतिहासिक बैठक

पूर्वीच्या काळीं अशीं भाषिक राज्यें नव्हतीं आणि त्यांचें कारणही नव्हतें. तथापि महाराष्ट्र म्हणजे मराठी बोलणाऱ्यांचा देश अशी व्याख्या मात्र ५०० वर्षां पूर्वी महानुभावांनीं आपल्या ग्रंथांत केलेली आढळते. ' कलेढाणा पासोनी जेतुकी महाराष्ट्र भाषा वर्ते तो महाराष्ट्र '. या महाराष्ट्रांत खंडमंडळें म्हणजे विभाग आहेत असेंही महानुभावांनीं नमूद केलें आहे. हा विभाग करण्याचा स्वभाव महाराष्ट्राचा अद्याप कायम आहे. परंतु यामुळें हिंदच्या राष्ट्रीयत्वास धोका पोहोंचेल असें वाटण्याचें कारण नाहीं.

### महाराष्ट्राचें स्वभाव दर्शन

याच महानुभावांनीं आचारस्थल या ग्रंथांत महाराष्ट्राची महंत राष्ट्र, अलौकिक, सात्विक, अशी विशेषणें देऊन स्तुती केली आहे. अशी स्तुती

इतर प्रांतांची कोठेंही केल्याचें आढळत नाहीं. महानुभवांचा चक्रधर गुजराथी होता. याच महानुभवांनीं राष्ट्र म्हणजे देश अशी स्पष्ट व्याख्याही केलेली आहे. हाच राष्ट्राचा व भाषेचा अभिमान महाराष्ट्रांत अत्यंत जुना आहे.

उत्तर हिंदमध्यें भाषेचा प्रश्न नाहीं असें म्हणतात तें खरें नाहीं. तेथेंही हा प्रश्न आहेच. भाषेच्या प्रश्नाबरोबरच एक भारतीय दृष्टी वाढविली पाहिजे. आम्ही त्यांतही मागे नाहीं.

## सरकारची भाषावार प्रांतरचनेवर श्रद्धा नाही

भाषावार प्रांतरचना करण्यामागें अडचणी आहेत. परंतु त्या आधीं माझा असा सवाल आहे कीं, भाषावार प्रांतरचनेच्या तत्वावर सरकारची श्रद्धा आहे कां? घटना समितीनें प्रांतरचना भाषावार करावी या बाबत स्पष्ट तरतूद करावी एवढीच माझी मागणी आहे. घटना समितीनें नवी घटना करावी. नव्या निवडणुकींत निवडून आलेल्या लोकसभेवर सध्याच्या घटनेप्रमाणें एक बंधन घातलें जावें. हें बंधन असें कीं निवडून झाल्याबरोबर या सभेनें भाषावार प्रांत निर्मितीसाठीं एक तज्ज्ञ समिती नेमावी. या कमिटिनें चौकशी करावी, मर्यादा ठरवाव्या, नव्या भाषावार प्रांतांच्यासाठीं मतदारांच्या याद्या तयार कराव्या व पुढील निवडणुकी भाषावार प्रातां प्रमाणें घ्याव्या. अशी तरतूद झाली तर तंटाच संपला. अशी तरतूद केल्यास लोक, समितीशी चौकशी बाबत सहकार्य करतील व सध्यांच्या व भावी लोकसभेस इतर महत्वाचे प्रश्न सोडविण्यास मदत करतील. परंतु या सर्व गोष्टी होण्यास भाषावार प्रांत रचनेंवर श्रद्धा हवी.

## जयपूर समिती व नेहरू रिपोर्टांत विसंगती

भाषावार प्रांतरचनेचा प्रश्न अत्यंत सरळ असल्यानें नेहरू रिपोर्टांत 'अत्यंत सोपा प्रश्न व्यर्थ बिकट केला जातो. कारण त्याकडे बघण्याची दृष्टी चुकीची स्वीकारली जाते आणि दुसऱ्याच एखाद्या मुद्यावर लक्ष देऊन मुळ मुद्याकडे

दुर्लक्ष केलें जातें' अशा प्रकारचें जें विवेचन केलें आहे त्याचीच पुन्हां आठवण करून दिली पाहिजे. कारण हीच चूक दार समिती आणि जयपूर समिती या उभयतांनीं केली आहे.

माझा ग्रह असा झाला आहे कीं भाषावार प्रांतरचनेचें तत्व महात्मा गांधींच्या आग्रहास्तवच कॉंग्रेसनें स्वीकारलें असावें. नितांत श्रद्धेनें स्वीकारलें असतें तर आज या तत्वाला त्रासल्यासारखे होऊन जी गडबड उडालेली दिसते ती दिसली नसती.

मला एकाद्या घटनावाल्यांचें म्हणणें समजूं शकते. संघ स्वरूपाची लोकशाही पद्धतीची घटना करावयाची तर ती भाषावारच करावयास हवी. जुनी आश्वासनें पूर्ण व्हावयास हवींत. भलतेच प्रश्न पुढें करून टाळाटाळ व्हावयास नको आहे. त्यापेक्षां भाषावार प्रांतरचना अमान्य आहे असें स्पष्टपणें जाहीर केलें जावें.

स्वयंशासित घटक निर्माण करण्याचें घटनासमितीनें बंधन लादून घेतलें आहे. हें पुरें व्हावयास भाषावार घटक सिद्ध केलें पाहिजेत.

## मुंबई महाराष्ट्राचीच

मुंबईचा प्रश्न पुराव्यानें सिद्ध करावयास हवा. सार्वमतानें नाहीं. अशा कामीं सार्वमताचा प्रश्न उद्भवत नाहीं. माझ्या अंगावरील वस्त्रें माझीं आहेत किंवा नाहींत हें सार्वमतानें ठरविणार काय ? हा पुराव्याचा प्रश्न आहे आणि याला पुरावा भरपूर आहे. मुंबई हें एक बेट नसून एकूण ७ बेटांचा तो समूह आहे. तेथें पूर्वी कोळी, पाठारे प्रभू, पलहो ब्राह्मण या सर्व मराठी भाषिकांची भूमि होती. यांत शंकेला जागा नाहीं. अनेक सनदा, कागदपत्रें उपलब्ध आहेत.

मुंबईबद्दल आणखी एक गोष्ट महत्त्वाची आहे. मुंबईतील मत्ता कोणांत व कशी विभागली गेली आहे या विषयीचा पुढील पुरावा मी सादर करतों. या पुराव्यानें वस्तुस्थितीवर लख्ख प्रकाश पडेल.

# Administration Report
## Of the Municipal Commissioner
## For the City of Bombay for the year 1947—1948.

*Page 139–142 ( Assessment or Collection by S. V. Vartak Ag. Assessor & Collector )*

Out of the total number of 19,564 landlords who own properties in the city 16,117 i. e. nearly 82.4 per cent possess only one property each. Nearly 22.8 of the total rateable value is under the control of O.8 per cent of the landlords ( viz. 154 persons only each of whom owns properties having an aggregate rateable value exceeding Rupees one lac. 4 per cent of the remaining landlords control about 26 2 per cent of the total rateable value. Detailed statistics will be found in statement D )

या उताऱ्यावरून दिसेल कीं मुंबईतील ५० टक्के मत्ता सुमारें २०० लोकांच्या हातीं आहे. या २०० लोकांची महाराष्ट्राची मुंबई महाराष्ट्रांत राहूं नये अशी इच्छा आहे. हेच लोक महाराष्ट्राच्या न्याय मिळवण्याच्या कामी विरोध करीत आहेत.

महाराष्ट्र निर्मितीपुढें रक्तपाताचें भय उभें केलें जात आहे. आमची मागणी भाषावार प्रांताची आहे. वार करण्याची नाही. मग रक्तपात कसला होईल ! अन्याय चालूं ठेवल्यास चालूं ठेवणारास तसें भय वाटणें सहाजिकच आहे. तेव्हां काल्पनिक भय उभें करून किंवा वेड घेऊन पेडगांवला जाणाऱ्यांच्या बोलण्यानें विचकण्याचें कारण नाहीं.

### महाविदर्भवाल्यांना उत्तर

विदर्भाच्या प्रश्नासंबंधीं अकोलाकरार पाळण्याबद्दल वियाणी अव्हान करीत आहेत. ते जें बोलत आहेत तसल्या अकोला करारावर मी कोठेंही व

केव्हांही सही केलेली नाहीं. दार समितीच्या रिपोर्टांत तो कव्हर छापला आहे. तो कोणीही वाचून पहावा बियाणींची अक्षानें त्यांच्या अंगलट येतील.

शंकरराव मोरे यांना माझी अशी सूचना आहे कीं त्यांनीं महाविदर्भात जोरदार प्रचार करुन आपलें म्हणणें तिकडे पटवून द्यावें. भाषावार प्रांतरचना कोणीहि कांहींही म्हटलें तरी केल्याशिवाय गत्यंतर नाहीं व ती झाल्याशिवाय रहात नाही.

ही रचना लौकर, सुकर व शांतीनें व्हावी म्हणून पुन्हां लोकमताचें संघटीत स्वरुप शिस्तिनें आणि संयमानें घोषित केलें पाहिजे. एवढ्यानें यश-सिद्धी न झाल्यास राजकीय चळवळीच्या कोषागारांत अनेक प्रभावी हत्यारें किंवा साधनें साठविलेलीं आहेतच.

## आपण काय केलें पाहिजे

जसा रोग तसा उपाय. तेव्हां विरोधी पक्षाचीं पावलें ज्या दिशेनें पडतील त्या दिशेनें आम्हासहि पावलें टाकावीं लागतील. सध्याच्या उपायांनी न भागलें तर निर्वाणीचे उपाय अमलांत आणावे लागतील. तदपूर्वी आपलें म्हणणें व आपलें दुखणें सर्वांस प्रतीत होईल असा प्रचार आपण केला पाहिजे.

महाराष्ट्राच्या चार काँग्रेस समित्या केल्या त्या कां हें मला सांगता येत नाहीं. परंतु हेंच दुखणें आज बाधत आहे असें मला वाटतें. या समित्या एक करतां आल्यास संयुक्त महाराष्ट्राचा प्रश्न ८० टक्के सुटल्यासारखा होईल. पण तें आज होईलसें वाटत नाहीं म्हणून जयपूर समितीनें मागणी केल्या-प्रमाणें लोकमत तीव्र केलें पाहिजे. योग्य समयीं योग्य उपाययोजना करण्याचें कार्य राजकीय पुढाऱ्याचें आहे म्हणून माझें सांगणें आहे; कीं जे ज्या पक्षांत असतील त्यांनीं आपल्या पक्षांतील पुढाऱ्यांना संयुक्त महाराष्ट्राची मागणी करण्यास भाग पाडावें. प्रसंगीं त्यांचे कान पिळावे. असें झाल्यास यश फार दूर नाहीं.

---